महाराष्ट्र शासन

**संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई**

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१

दुरध्वनी:+९१-२२-२२६२०३६१-६५/२२६५२२५१/५७/५९. टेलीग्राम: "MEDUCATNSEARCH" फॅक्स:+९१-२२-२२६२०५६२/२२६५२१६८

संकेतस्थळ: http://www.dmer.org

क्र.संवैशिवसं/एमएच-सीईटी२०१५/बीएएमएस व इतर/रिक्त जागा/नोटी-१७/१-अ, दिनांक : १३/१०/२०१५

# एमएच-सीईटी-२०१५ - नोटीफिकेशन

**शासकीय/ महानगरपालिका व शासन अनुदानित बी.ए.एम.एस./ बी.यु.एम.एस./ फिजीओथेरेपी/ ऑक्युपेशनलथेरपी/ बीएएसएलपी/ बी. (पी.ॲन्ड ओ.)/बी.एसस्सी. नर्सिंग महाविद्यालयातील आणि खालील फिजीओथेरपी खासगी विनाअनुदानित महाविद्यालयातील रिक्त जागा भरणेबाबत.**

## फिजिओथेरपी खासगी विनाअनुदानित महाविद्यालये

| | | | |
|---|---|---|---|
| १ | के.जे.सोमय्या कॉलेज ऑफ फिजी. मुंबई | २ | मॉडर्न कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, पुणे |
| ३ | एमआयएमईआर फिजी.कॉलेज, पुणे | ४ | श्रीमती.काशिबाई नवले फिजी.कॉलेज, पुणे |
| ५ | महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ फिजी., लातूर | ६ | डॉ.व्ही.व्ही.पाटील कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, अहमदनगर |
| ७ | डॉ.उल्हास पाटील फिजी. कॉलेज, जळगाव | ८ | डॉ.वसंतराव पवार फिजीओथेरपी कॉलेज, नाशीक |
| ९ | व्हीएसपीएम कॉलेज ऑफ फिजीओथेरपी, नागपुर | | |

## बी.ए.एस.एस खासगी विनाअनुदानित महाविद्यालये

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एम.इ.एस. आयुर्वेद महाविद्यालय, खेंड | २ | महाराष्ट्र आरोग्य मंडळ सुमतीबाई शहा, पुणे |

**उपरोक्त आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या संबंधित महाविद्यालयांची एकत्रित निवड यादी दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी संचालनालयाच्या "www.dmer.org" या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे. सदर यादीमधील निवड यादीमधील निवड झालेल्या उमेदवारांना महाविद्यालयात रुजू होण्याकरिता आणि स्टेटस् रिटेंन्शन अर्ज सादर करण्याकरिता दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ असा अंतिम दिनांक देण्यात येत आहे.**

वैद्यकीय व दंत अभ्यासक्रम वगळून ज्या विद्यार्थ्यांची पुर्वी इतर अभ्यासक्रमामध्ये निवड झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांनी स्टेटस् रिटेंन्शन अर्ज भरलेला नसेल अशा विद्यार्थ्यांना स्टेटस् रिटेंन्शन अर्ज महाविद्यालय मध्ये अधिष्ठाता / प्राचार्य कार्यालयात जमा करावा आणि त्याची एक प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई याच्या "dmercetcell@gmail.com" हया इ-मेल वर पाठविण्यात यांवी. स्टेटस् रिटेंन्शन भरण्यासाठी १५ ऑक्टोबर २०१५ पर्यत मुदत देण्यात आलेली आहे.

उपरोक्त अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ नंतर रिक्त राहिलेल्या प्रवर्गनिहाय जागांवर एमएच-सीईटी-२०१५ च्या नियमानुसार संबंधित महाविद्यालयांमार्फत प्रवेश केले जातील. संबंधित महाविद्यालये व उमेदवारांनी प्रवेशासंबंधी खालील दर्शविलेल्या वेळापत्रकाची नोंद घ्यावी.

| क्र. | सूचना | वेळापत्रक |
|---|---|---|
| १. | महाविद्यालयनिहाय रिक्त जागांचा तक्ता संचालनालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध राहील. (www.dmer.org) | २७/१०/२०१५ |
| २. | विद्यार्थ्यांनी व्यक्तिश:(विद्यार्थी किंवा पालक) त्यांना हव्या असलेल्या महाविद्यालयात प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी. (एमएच-सीईटी-२०१५ च्या ऑनलाईन गुणपत्रिकेची आणि सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायाप्रतींसह) | २७/१०/२०१५ ते २८/१०/२०१५ |
| ३. | महाविद्यालयाने त्यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जांमधून गुणवत्ता यादी तयार करुन ती महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रकाशित करणे. | **२९/१०/२०१५** (सकाळी ११.०० वाजता) |
| ४. | निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात रुजू होण्याचा कालावधी. | ३१/१०/२०१५ पर्यंत |
| ५. | **प्रवेशाचा अंतिम दिनांक** | **३१ ऑक्टोबर २०१५** |

विद्यार्थ्यांचे पात्रता निकष व नियम हे एमएच-सीईटी-२०१५ च्या आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या नियमावली (एमएच-सीईटी २०१५ सामाईक प्रवेश परीक्षा नियमावली पुस्तिका आणि पसंतीक्रम अर्ज माहितीपुस्तिका) पुस्तिकांप्रमाणे रहातील. उपरोक्त महाविद्यालयांनी वर नमूद केलेल्या सूचना आणि वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

**शैक्षणिक वर्ष २०१५-२०१६ करिता अभ्यासक्रम निहाय प्रवेशाची कट-ऑफ-डेट खालीलप्रमाणे आहे.**

(१) बी.ए.एम.एस./ बी.यु.एम.एस. (केंद्रीय परीषदेने निर्धारीत केल्याप्रमाणे) : **३१ ऑक्टोबर २०१५**

(२) फिजीओथेरेपी/ ऑक्युपेशनलथेरेपी/ बीएएसएलपी/ बीपी ॲन्ड ओ./ बी.एससी. नर्सिंग : **३१ ऑक्टोबर २०१५**

**टिप :**

- **बी.ए.एम.एस. आणि बी.यु.एम.एस. अभ्यासक्रमाकरिता इच्छुक असलेल्या उमेदवारांनी संस्थास्तरावरील प्रवेशापूर्वी कृपया संबंधित महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडीसीन, नवी दिल्ली (www.ccimindia.org) यांची परवानगी आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (www.muhs.ac.in) यांची संलग्नता प्राप्त असल्याबाबतची खाजतरजमा संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळास भेट देवून करण्यात यावी.**
- **संबंधित महाविद्यालयास उक्त प्राधिकरणांची परवानगी किंवा संलग्नता प्राप्त नसल्यास व अशा महाविद्यालयामध्ये उमेदवाराने प्रवेश घेतल्यास त्याकरिता हे संचालनालय जबाबदार रहाणार नाही.**

**सक्षम प्राधिकारी व संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**